11:24:25 AM **रे.क्रि.केस नं. १८/ २०२२**

महोराष्ट्र शासन वि. संजय दादू खोत

**निशाण नं. २० /क**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी.**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – जालिंदर गणपती खुटाळे

वय – ३७वर्षे

धंदा – रिक्षा चालक व शेती

राहणार – खुटाळवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु**

१. पांडुरंग गणपती खुटाळे (मयत) हे माझे भाऊ आहेत. सदरची घटना अंदाजे ५ ते ६ वर्षापूर्वी घडली होती. त्यावेळी अपघात झाला होता. माझे भाउ आरोपी यांच्या गाडीवरून पडले होते. त्या दिवशी माझे भाउ व आरोपी हे कामानिमित्त गेले होते. ते कोठे गेले होते ते मला माहीत नाही. सदरचा अपघात पैजारवाडी येथे झाला होता. मला सदर अपघताबाबत मला कोणाचा तरी फोन आला होता. फोन आल्यानंतर मी अपघाताच्या ठिकाणी गेलो. मी तेथे गेलो त्यावेळी माझे भाउ यांना कोल्हापूर येथे नेण्यात आले होते. मी कोल्हापूर येथे दवाखान्यात गेलो होतो. माझ्या भावाला दवाखान्यात अॅडमिट करण्यात आलेले होते. डॉक्टरांनी सांगितले तुमच्या भावाच्या मेंदूला मार लागला आहे. डॉक्टरांनी ऑपरेशन केले. माझ्या भावाचे निधन झाले. सदरचा अपघात डॉक्टरांनी गाडीवरून पडल्यामुळे झाला व

त्यामुळे मृत्यू झाल्याचे सांगितले. सदर ठिकाणी मी पोहोचल्यानंतर अपघात कसा झाला याबाबत मला आठवत नाही.

**(साक्षीदार सरकार पक्षास पूरक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.)**

२.दि. १६.०६.२०२१ रोजी माझे भाऊ पांडुरंग खुटाळे व आरोपी संजय खोत हे त्याच्या मोटर सायकलवरून भाउ पांडुरंग खुटाळे यांच्या सासरवाडीत गेले होते किंवा कसे ते मला आठवत नाही. तेथून ते परत येत होते त्यावेळी आरोपी हा वेगाने गाडी चालवत होता त्यावेळी माझा भाऊ पाठीमागे बसला होता, आवळी गावच्या फाटयाजवळ गाडीवरील ताबा सुटल्यामुळे गाडीचा अपघात झाला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. सदर अपघताबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद व प्रथमवर्दी वरील सही माझी आहे. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि. २१ नि. २२**</u> देण्यात येत आहे. आरोपी हे माझ्या भावकीतील आहेत. पांडुरंग खुटाळे यांच्या पश्चात त्यांची पत्नी अर्चना खुटाळे, आई शालाबाई गणपती खुटाळे, मुलगी मयुरी पांडुरंग खुटाळे, मुलगा साहील पांडुरंग खुटाळे हे आहेत. साहील याचे वय १९ वर्षे आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

<u>**सरतपास पुर्ण.**</u>

<u>**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एस. पी. लोखंडे यांचेमार्फत सुरु,**</u>

३.मी रिक्षा चालवतो तसेच मी शेती करतो. माझा भाउ पांडुरंग याचा अपघात झाल्याबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. माझा भाऊ कोणासोबत व कोठे गेला होता याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी दवाखान्यात गेलो त्यावेळी मला ऐकीव माहितीवरून माझा भाउ आरोपीसोबत गेला होता असे कळले. ज्यावेळी मी फिर्यादी दिली, ज्यावेळी माझा पोलिसांनी जबाब नोंदविला त्यावेळी पोलिसांनी नोंदविलेल्या जबाबावर मी

सही केली. सरतपासात दाखविलेला जबाब मी त्यावेळेला वाचलेला नव्हता. मी दिलेली फिर्यादी ही फक्त दवाखान्यात समजलेल्या ऐकीव माहितीवर दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझेमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तशी तडजोड पुरसीस व अर्ज आम्ही न्यायालयात दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर आरोपीविरुद्ध आता माझी कोणतीही तक्रार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

11:24:25

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. १७.०२.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा